


कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे

साप्ताहिक

# क्रांतिवीर

संपादक-मोहन गुंड

skrantiveer66@gmail.com

**क्रांतिवीर**

बीड जिल्ह्यात तालुका,शहर प्रतिनिधी नेमणे आहेत, इच्छुकानी संपर्क साधावा

मोबा.९४२३९७९४९२

वर्ष १३ वे अंक ३५ वा | सोमवार,दि.१३ एप्रिल २०२६ | RNI.No.MHMAR/ 2013/50191 | पाने ४ | किंमत १ रुपये

# मराठवाडा विभागात शेकापक्ष विस्ताराची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्या खांद्यावर



## शेकापने दिला अनेक वर्षे चळवळीचा अनुभव प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक चेहरा

केज /क्रांतिंवीर प्रतिनिधी

भारतीय शेतकरी कामगार पक्षाचा मराठवाडा एकेकाळी बालेकिल्ला होता. मराठवाड्याने शेकापला दिग्गज नेते दिले यामध्ये उस्मानाबादचे विरोधी पक्ष नेते, खासदार स्वातंत्र्य सैनानी भाई उध्दवराव पाटील, माजी खासदार भाई ड. नरसिंगराव काटीकर, परभणीचे आमदार भाई अण्णासाहेब गव्हाणे, नांदेडचे माजी खासदार, आमदार भाई डॉ. केशवराव धोंडगे, अहमदपूरचे माजी मंत्री किसनराव देशमुख, परभणीचे माजी खासदार शेषराव देशमुख, तुळजापूरचे माजी आमदार मानिकराव खपले, परभणीचे भाई लक्ष्मणराव नाना गोळेगावकर, कळंबचे माजी आमदार कुंडलिकराव घोडके , निलंग्याचे माजी आमदार भाई श्रीपतराव साळुंके,औसाचे माजी आमदार भाई मल्लनाथ गुंडनाथआप्पा, कंधारचे माजी आमदार गुरुनाथ कोरडे, गंगाखेडचे माजी आमदार भाई ज्ञानोबा गायकवाड,बीडचे जनार्दन तुपे, परतुरचे भाई माजी बारकुले या नेत्त्यांसह शेकडोवर आक्रमक झुंजार कार्यकर्त्यांची स्थानिक पातळीवर काम करणारी शेकापची मोठी फळी मराठवाड्यामध्ये होती. अलीकडच्या काळात भांडवली, जातीय गलिच्छ राजकिय समीकरणात चळवळीपासुन तरूण दुरावत गेले, पक्षाचे मराठवाड्यात बोटावर मोजण्याइतकेच लोक पक्षात उरले आहेत. आशा परिस्थितीत प्रचंड जनसंपर्क असणारा आक्रमक आंदोलनातील चेहरा म्हणून ओळख असणारे शेकापचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांच्यावर दौरे करुन बांधणीची जबाबदारी देण्यात आल्यामुळे मराठवाड्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

मराठवाडा विभागातील पक्ष संघटन बांधणीसाठी पुर्ण वेळ काम करणारे भाई मोहन गुंड यांच्यावर जबाबदारी द्यावी अशी मागणी अनेक कार्यकर्त्यांची होती, त्या अनुषंगाने पक्षाचे सरचिटणीस मा. आमदार भाई जयंत पाटील यांच्या आदेशान्वये मराठवाडा विभागाची जबाबदारी भाई मोहन गुंड यांच्यावर सोपवण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ड.राजेंद्र कोरडे यांनी या संदर्भातील पत्र भाई मोहन गुंड यांना दिले आहे. या पत्रानुसार मराठवाडा विभागात पक्षाचा दौरा आयोजित करून ग्राम, तालुका व जिल्हा स्तरावर पक्ष संघटन करणे अपेक्षित आहे, पक्ष विस्तारासाठी समित्यांची स्थापना करणे, पदाधिकाऱ्यांची निवड करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी जनसंघटना आघाड्याची स्थापना करून त्यावर पदाधिकारी नेमण्याचे अधिकार ही भाई मोहन गुंड यांना देण्यात आले आहेत. केलेल्या कामाचा सविस्तर अहवाल वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयात पाठवण्याच्या सूचना ही देण्यात आल्या आहेत. या निवडीमुळे मराठवाड्यात शेतकरी कामगारांच्या प्रश्नांवर शेकाप अधिक आक्रमकपणे काम करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांमधून व्यक्त होत आहे. भाई मोहन गुंड हे चिटणीस मंडळाचे सदस्य असून अत्यांत चिकाटीने जिद्दीने प्रमाणीकपणे काम करणारा चेहरा म्हणुन त्याची मराठवाड्यात ओळख आहे. अनेक शेतकरी कामगाराचे यशस्वी आंदोलने त्यांच्या नावावर आहेत, सक्रीय चळवळीतील अनुभवाचा फायदा पक्ष कार्यकर्त्यांना होईल असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. मराठवाडा विभागासह राज्यभरातून भाई मोहन गुंड यांचं अभिनंदन करण्यात येत आहे, मात्र पुन्हा शेतकरी कामगार पक्ष मराठवाड्यामध्ये उभा करणे हे त्यांच्या समोरील मोठं आव्हान असणार आहे हे मात्र नक्की.

**मे मध्ये मराठवाड्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची तातडीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे, पूर्ण विभागामध्ये तालुका दौरे करून जुन्या नव्या कार्यकर्त्यांची सांगड घालून प्रत्येक तालुक्यामध्ये कमिटी स्थापन करून, शेतकरी कामगाराच्या प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाचा कार्यकर्ता प्रत्येक तालुक्यात मराठवाड्यामध्ये शेकापचे कार्यकर्ते अग्रही भूमिका घेऊन प्रश्न सोडवण्यासाठी काम करतील या साठी मी स्वतः लक्ष घालणार आहे प्रत्येक गावात गावात शेकापचे विचार पोहचविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळाचे सदस्य भाई मोहन गुंड यांनी व्यक्त केले आहेत.**

# रुपाली चाकणकरांची बहीण चौकशीसाठी शिर्डी पोलीस ठाण्यात पोहोचली





नाशिक। क्रांतिंवीर प्रतिनिधी

भोंदू बाबा अशोक खरात याच्या काळ्या साम्राज्याचे धागेदोरे आता राजकीय वर्तुळातील नातेसंबंधांपर्यंत पोहोचले आहेत. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या बहीण प्रतिभा चाकणकर आज शिर्डी पोलीस ठाण्यात चौकशीसाठी हजर झाल्या आहेत. समता पतसंस्थेतील संशयास्पद कोट्यवधींच्या व्यवहाराप्रकरणी पोलिसांनी त्यांना नोटीस बजावली होती. अशोक खरात विरोधात शिर्डीत बेकायदेशीर सावकारी आणि फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत. तपासादरम्यान पोलिसांना 'समता पतसंस्थेत' खरातशी संबंधित अशी १३२ संशयास्पद खाती आढळली आहेत, ज्यामध्ये खरात हा 'नॉमिनी' (वारसदार) आहे. धक्कादायक बाब म्हणजे, यातील ४ खाती प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलांच्या नावे आहेत.

पोलीस तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, प्रतिभा चाकणकर यांच्या नावे २ खाती आहेत. त्यांच्या मुलांच्या नावे २ खाती आहेत. या चारही खात्यांवरून एकूण २ कोटी ४० लाख रुपयांचे मोठे व्यवहार झाले आहेत. या पैशांचा स्रोत काय? हे पैसे खरातच्या सावकारी व्यवसायाशी संबंधित आहेत का? आणि या व्यवहारांमागे खरातचा नेमका हेतू काय होता? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी शिर्डी पोलिसांनी चाकणकर यांचा जबाब नोंदवण्यास सुरुवात केली आहे.

यापूर्वीच अशोक खरातशी असलेल्या संबंधांच्या आरोपावरून रुपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आता त्यांच्या सख्ख्या बहिणीचीच पोलीस चौकशी सुरू झाल्याने या प्रकरणाला मोठे राजकीय वळण मिळाले आहे. शिर्डी पोलिसांनी प्रतिभा चाकणकर यांच्या दोन पत्त्यांवर नोटीस धाडली होती, त्यानंतर त्या आज चौकशीसाठी हजर झाल्या आहेत. पोलिसांनी आतापर्यंत या प्रकरणाशी संबंधित ३३ खातेदारांचे जबाब नोंदवले आहेत. मात्र, चाकणकर कुटुंबाशी संबंधित असलेल्या या खात्यांमधील मोठी रक्कम पाहता, प्रतिभा चाकणकर यांचा जबाब या संपूर्ण तपासातील सर्वात महत्त्वाचा दुवा मानला जात आहे. प्रतिभा चाकणकर काय जबाब नोंदवणार? अशोक खरातविषयी काय बोलणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# अमेरिकेने पर्शियन गल्फचं नाव बदललं

## होर्मुझची सामुद्रधुनीबाबतही मोठा निर्णय

नवी दिल्ली। क्रांतिंवीर प्रतिनिधी

इराण आणि अमेरिकेची चर्चा फिस्कटल्यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी करणार आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीकडे अमेरिका पाणसुरूंगरोधी जहाजं पाठवण्याची तयारी करत आहे अशी माहिती समोर येत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीकडे जाणाऱ्या येणाऱ्या जहाजांचं नियंत्रण अमेरिका करेल, असं ट्रम्प यांनी जाहीर केलंय. इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीवर नियंत्रण सोडायला तयार नाही. त्यामुळे आता इथला तणाव कमालीचा वाढण्याची भीती आहे. याचदरम्यान आता एक महत्वाची माहिती समोर आली आहे.

अमेरिकेने पर्शियन गल्फचं नाव बदललं आहे. अमेरिका पर्शियन गल्फला आता अरेबियन गल्फ म्हणून संबोधणार आहे. अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने या नव्या नावाची घोषणा केली आहे. यासोबतच 'होर्मुझची सामुद्रधुनी' हे नाव वापरणेही बंद करण्यात आले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीचंही नाव बदलण्याचा अमेरिकेचा घाट असल्याचं दिसून येत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीवर इराणने प्रत्युत्तर दिलंय. बिगर लष्करी जहाजांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी खुली आहे, मात्र लष्करी जहाजांना होर्मुझच्या सामुद्रधुनीत प्रवेश करता येणार नाही असं इराणने स्पष्ट केलंय. होर्मुझच्या सामुद्रधुनीचं नियंत्रण इराणी लष्कराकडेच आहे असाही दावा इराणने केलाय. तसंच होर्मुझच्या सामुद्रधुनीत येऊन लष्करी कारवाई करण्याचा प्रकार कोणत्याही देशाने केला तर तो खपवून घेतला जाणार नाही असंही इराणने म्हटलंय. होर्मुझच्या सामुद्रधुनीत नजीकच्या काळात कोणत्याही देशाचं नौदल दिसल्यास ते युद्धविरामाचं उल्लंघन मानलं जाईल, असं ट्रम्प म्हणाले.

मुंबई । क्रांतिंवीर प्रतिनिधी

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या चिरतरुण आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या आज काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. आशा भोसले यांच्या छातीत संसर्ग झाल्याने त्यांना शनिवारी रात्री उशिरा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. आज आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी आशा भोसले यांच्या निधनाची माहिती दिली. आज दुपारी ४ वाजता आशा भोसले यांच्या पार्थिवावर अत्यंसंस्कार करण्यात आले आहे.

# देशाचा आवाज हरपला

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन!



**वयाच्या ९२ व्या वर्षी निधन ; मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात घेतला शेवटचा श्वास**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी घेतले अंतिम दर्शन!**

**राज ठाकरे, आशिष शेलार, यांच्यासह बॉलीवूड अभिनेत्यांची दर्शनासाठी रांग!**

### सांगली जिल्ह्यावर पसरली शोककळा !

सांगली या ठिकाणी आशा भोसले यांचा जन्म झाला होता. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांनी गायनाला सुरुवात केली होती. गिनीज बुकमध्ये सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी त्यांची नोंद झाली आहे. आपल्या वेगळ्या आवाजाची भुरळ सगळ्या जगाला पडली होती. त्या जरी आपल्याला सोडून गेल्या असल्या तरीही त्यांचं गाणं कायमच आपल्या सोबत राहणार आहे. तो आवाज कायमच आपल्याला साथ देईल यात शंका नाही.

त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टी, गायन क्षेत्र आणि कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. आशा भोसले यांचे चिरंजीव आनंद भोसले यांनी ही माहिती दिली की त्यांची आई आणि ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं निधन झालं आहे. आशा भोसलेंचे अवयव निकामी होत गेले, त्यामुळे त्यांचं निधन झालं. आशा भोसले यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांची प्राणज्योत मालवली आहे. सकाळी ११ ते २ या वेळेत त्या लोअर परळ या ठिकाणी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. आज दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क या ठिकाणी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत अशी माहिती आनंद भोसले यांनी दिली.ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या चिरतरुण आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या आज काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत.

# संपादकीय


## चांचल्य विजेचे, दर्याचे गांभीर्य

देश स्वतंत्र झाला तेव्हा दीनानाथ–माई मंगेशकरांची तिसरी कन्या आशा फक्त १४ वर्षांची होती. आजच्या भाषेत पौगंडावस्थेत. तोपर्यंत तिच्या डोळ्यादेखत नूरजहाँ 'जवाँ है मुहब्बत' म्हणू लागल्या होत्या, शमशाद बेगम या 'मेरे पिया रंगून' गेल्याने त्याच्या 'टेलिफून'ची वाट पहात होत्या आणि सैगल यांचा सभ्य– सानुनासिकतेतील 'बाबुल मोरा नैहर छूट ही जाय' जगण्यातील विषाद व्यक्त होत होता. आशाची मोठी बहीण लता गायला लागली होती. आशाबाई आणि तिच्यात चार वर्षांचे अंतर. त्यांचे वडील दीनानाथ यांचे निधन झाले तेव्हा लता अवघ्या १३ वर्षांची होती आणि आशा तर नऊ. दीनानाथांच्या नाट्यकंपनीशी निकटचे मास्टर विनायक यांनी मग या कुटुंबाची साथ केली आणि हे सर्वजण जगण्यासाठी मुंबईला आले. जगण्याच्या संघर्षात कुटुंबाला चार घास मिळावेत म्हणून आशाबाईंनाही मोठ्या बहिणीप्रमाणे जे जमत होते ते करण्याखेरीज पर्याय नव्हता. आज गाणे हे अनेकांसाठी करिअर–बिरिअर असले तरी दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या मंगेशकर कुटुंबासाठी त्या वेळी ती रोजी–रोटी होती. त्यामुळेच जेमतेम दहा वर्षांच्या असतील नसतील, आशाताईंचे पहिले गाणे प्रकाशित झाले होते. मोठी बहीण आधीच गाऊ लागली होती. पण तिचे नाव झाले, गायिका म्हणून ओळख निर्माण व्हायला १९४९ साल उजाडले. स्वातंत्र्यानंतरच्या दोन वर्षांत लताबाईंचे 'आयेगा आने वाला' घराघरात गेले आणि मंगेशकर कुटुंबीयांच्या अंगणातल्या स्वरवेलींना बहर आणि बहार येऊ लागली. आज २०२६ साली कर्तृत्वाचा वेलु गगनावरी गेलेला असताना यातील दुसरी वेल पुन्हा कधीही न वाढण्यासाठी उन्मळून पडली. आशाबाई गेल्या.

थोरल्या लताबाईंच्या अत्यंत समृद्ध स्वर रसायनास एखाद्या अत्यंत उंची, डोळे/ कान दिपवणार्या, तेजस्वी कणसुराची जोड म्हणजे आशाबाईंचा आवाज. लताबाईंच्या आवाजातील अधिकारी थोरलेपण झुगारून बंडखोरीच्या उत्फुल्लतेची साथ आशाबाईंच्या गाण्यास लाभली. लताबाईंची सांगीतिक थोरवी रसिकांस चार हात दूर ठेवी. आशाताई स्वत:मधील त्या थोरवीचा बुरखा दूर करून स्वत: रसिकांपर्यंत जात. त्यांना जवळ घेत. लताबाईंचा स्वर अमर्त्य आणि अमर. आशाबाईंचा स्वरही अमर्त्य आणि अमर. तरीही या दोघींच्या गाण्यात फरक होता. तो असा की आपले स्वर्गीय गाणे सादर करून लताबाई पुन्हा आपल्या यक्ष, गंधर्वांच्या सहवासात परत जात आणि आशाबाई आपले स्वर्गीय गाणे सादर करून मर्त्य मानवांच्या कळपांत सहज विहरत. कळू लागेपर्यंत मोठ्या बहिणीचा मोठेपणा अनुभवला असल्यामुळे असेल कदाचित; पण आशाबाईंनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी आपले गाणे, अस्तित्व अधिक शारीर ठेवले. लताबाईंचे 'अवचिता परिमळु' किंवा 'विश्वाचे आर्त' मानवी अस्तित्वास शून्याकडे नेते तर आशाबाई आपल्या 'कानडा वो विठ्ठलु, करनाटकु' ने त्या अस्तित्वास अर्थ देतात. वास्तविक लताबाईंचे 'मालवून टाक दीप' हे आशाबाईंच्या 'तरुण आहे रात्र'च्या जातकुळीतले. पण दोन्हींचा होणारा परिणाम एकदम भिन्न. या अशा दोन वेगवेगळ्या परिणामांची अनुभूती हे या दोघींचे मोठेपण. या दोघीही जोपर्यंत गात होत्या तोपर्यंत त्यांनी आपले शिखरस्थान कधीही सोडले नाही. या भगिनींस ते शक्य झाले कारण त्यांची संगीतकला आणि तिचे अमरत्व. एखाद्याच्या अभिनयास उतरती कळा लागू शकते, एखादा चित्रपट फसू शकतो, कवी–लेखकाची प्रतिभेची साथ सुटू शकते. पण संगीतकलेचे तसे नाही. आनंदी, दु:खी, उत्साही, उन्मादी आदी अशा कोणत्याही प्रसंगी मनुष्यास संगीताची साथ हवीहवीशीच असते. लता–आशा यांनी ती त्यांच्या हयातभर दिली. या दोघी कधीही न झाकोळल्या गेलेल्या 'लीजंड' बनल्या त्या यामुळे. असे एकाच घरातील दोघी दोघींनी इतकी उंची एकाच काळी, एकाच वेळी गाठणे हे कमालीचे दुर्मीळ. म्हणून लता–आशा या अशा दुर्मीळ प्रजातीच्या ठरतात. एखाद्या भव्य कलाकृतीवर पडदा पडल्यानंतर प्रेक्षागृहातील रसिकांस एक प्रकारची शांत–सुन्नता काही क्षण स्तब्ध करते. आपण नक्की काय अनुभवले आणि तो अनुभव आता संपला हे कळण्यास काही पळांचा अवधी लागतो. आशाबाईंच्या जाण्याने आपण नक्की काय गमावले हे कळण्यासाठीही समाजास असाच काही काळ लागेल. लताबाईंच्या जाण्याने आलेले सुन्नपण दूर व्हायच्या आत आशाताई गेल्या. त्यामुळे येणारी स्वरसुन्नता आणखी काही काळ तरी सहन करावी लागणार.

अलीकडे जेमतेम एखाद्या आठवड्यांच्या प्रसिद्धीनंतर ''आज मी जो/जी काही आहे'' अशी बिनडोक, पोकळ भाषा करणार्यांचा आणि ती ऐकणार्यांचा सुळसुळाट कला विश्वास झाकोळून टाकत असताना या अर्धवटरावांस अविश्वसनीय वाटेल अशा एका प्रखर वास्तवाची आठवण करून द्यायलाच हवी. हे वास्तव आहे आशाबाईंच्या कार्यकालाचे. लता मंगेशकर नामक स्वरसूर्य तळपत असतानाही आशा भोसले यांची सांगीतिक कारकीर्द तब्बल आठ दशकांची आहे. वयाच्या अवघ्या दहाव्या वर्षी त्या गाऊ लागल्या आणि वयाच्या शतकापासून दशकभर दूर असतानाही त्या गात होत्या. आपली नव्वदी त्यांनी दणक्यात गाऊन सादर केली. गाणे मनाला हलवते हे तर खरेच. पण त्या हलत्या मनाचा शरीरावरही परिणाम होत असतो आणि मनात उमटणार्या स्वरलाटा शरीर संवदेनांवर 'आतून' आघात करत असतात. असे झाले की नृत्य उमटते. आशाबाई वयाच्या नव्वदीतही स्वरांना असे आतून–बाहेरून व्यक्त होऊ देत. वयामुळे येणारी ढुढ्ढाचार्यता त्यांना कधी स्पर्शच करू शकली नाही. त्यामुळे त्या कधी पंडिती वाटल्या नाहीत. हे पांडित्याचे ओझे थोरल्या बहिणीच्या खांद्यावर सुपूर्द केल्यामुळेही असेल, आशाबाई मनाने कायम तरुण राहिल्या. त्याचमुळे आजच्या, उद्याच्या कलाकर्मींशी त्या स्वत:ला सहज जोडून घेत. आपला संघर्षकाल, त्यातील धडपड, स्वत:ला सिद्ध करण्यासाठीच्या घर्षणात शरीरभर आणि मनभर झालेल्या जखमा त्या कधीच विसरल्या नाहीत. पण त्यांचे मोठेपण असे की या अशा पूर्व संघर्षामुळे स्वभावात येणारी कटुताही त्यांना कधी स्पर्श करू शकली नाही. ''ठीक आहे, होते असे'', असे म्हणत त्या पुढे चालू लागत. याचमुळे वैयक्तिक आयुष्यात अनेक जन्मातही कोणाच्या वाट्यास येऊ नयेत अशी आणि इतकी दु:खे त्यांच्या वाट्यास आली. पण या कोणत्याही वेदनेची काळी सावली त्यांनी कधी आपल्या स्वरांवर आणि स्वभावावर पडू दिली नाही. सतत कालसापेक्ष, तरुण राहण्याचा–किंवा खरे तर दिसण्याचा– त्यांचा अट्टहास कधी अनैसर्गिक, कृत्रिम वाटे हे खरे. पण वैयक्तिक आयुष्यात आलेल्या अतिकडवट अनुभवांस गाडण्यासाठी त्यांना या अशा कृत्रिमतेचा आधार घ्यावा लागला असावा.आशाबाईंची आवर्जून नमूद करावी अशी बाब म्हणजे मराठी संगीतातील त्यांचा वाटा. लताबाईंनी आपल्या स्वरातिस्तत्वाने हिंदी चित्रपट संगीताचा सगळा अवकाश भरून टाकलेला असताना आशाबाईंनी त्यातही आपले आकाश शोधले. जोपासले. पण मराठी संगीताचा अधिक मोठा वाटा आशाबाईंनी उचलला.

# सामाजिक क्रांतीचे मशाल पेटवणारे महानायक
# क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले



भारतीय समाज रचनेत अनेक शतकापासून रूढी ,परंपरा आणि अंधश्रद्धेचा पगडा होता. जातीभेद आणि स्त्रीदास्य यामुळे समाजातील मोठा वर्ग अज्ञानाच्या अंधारात अडकून होता . तेव्हा त्या अंधाराला छेद देणारी एक क्रांतिकारी विचारांची तेजस्वी ज्योत प्रकट झाली–ती म्हणजे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले.कारण समाज बदलायचा असेल तर केवळ सत्ता संपत्ती परंपरा पुरेशी नसते तर त्यासाठी क्रांतिकारी विचारांची आवश्यक असते .आणि तेही अशे विचार जे अन्यायाला थेट प्रश्न विचारतात. आणि याच विषयाचा बळावर त्यांनी सामाजिक क्रांती घडवून आणली.त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर त्या विचारांना कृतीची धार देत समाजपरिवर्तनाची मशाल प्रज्वलित केली.

ज्योतिबांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. बालपण गरिबीत गेले, पण त्यांच्या मनात ज्ञानाची तहान होती. शाळेत जाण्याची संधी मिळाली, परंतु समाजातील उच्चवर्णीयांच्या नजरेत शिक्षण हे त्यांच्यासाठी निषिद्ध होते. तरीही त्यांनी शिक्षणाचा ध्यास सोडला नाही. त्यांच्या आयुष्यातील एक निर्णायक प्रसंग म्हणजे एका जिवलग मित्राच्या लग्नात त्यांचा झालेला अपमान. त्या अपमानाने त्यांच्या मनात विद्रोहाची ठिणगी पेटली–ही ठिणगीच पुढे सामाजिक क्रांतीची ज्वाला बनली.

या प्रखर ज्वालेला आकार देण्यासाठी त्यांना साथ लाभली ती त्यांच्या जीवनसाथीची– त्या माऊलीने प्रत्येक क्षणामध्ये ज्योतिरावांच्या खांद्याला खांदा देऊन प्रत्येक कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. सावित्रीबाईंच्या रूपाने त्यांना केवळ पत्नी नव्हे, तर सहकार्य, प्रेरणा आणि संघर्षाची सखी मिळाली. दोघांनी मिळून १८४८ साली मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात मुलींचे शिक्षण म्हणजे पाप मानले जात होते, पण फुले दांपत्याने या समजुतीला धैर्याने आव्हान दिले.

त्यांच्या शैक्षणिक कार्याला उस्मान शेख आणि फातिमा शेख यांचीही मोठी साथ मिळाली. फातिमा शेख यांनी स्वतः शिक्षिका म्हणून काम करत मुलींच्या शिक्षणासाठी योगदान दिले. हे सहकार्य त्या काळातील सामाजिक ऐक्याचे आणि मानवतेचे प्रतीक होते.

ज्योतिबा फुले यांचा व्यवसाय फुलांचा होता, पण त्यांच्या विचारांनी समाजाच्या मनात परिवर्तनाची फुले उमलवली. त्यांनी पाण्याच्या पानवट्यांची व्यवस्था करून अस्पृश्यांना पाणी मिळवून दिले. समाजाने ज्या लोकांना वंचित ठेवले होते, त्यांच्यासाठी त्यांनी आपले घर, आपले जीवन खुले केले. विधवांसाठी आश्रय, अनाथ मुलांसाठी संरक्षण आणि स्त्रियांसाठी शिक्षण–या सर्व क्षेत्रात त्यांनी अद्वितीय कार्य केले.

१८७३ साली त्यांनी सत्यशोधक समाजाचे ची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सत्य, समता आणि बंधुता यांचा प्रचार केला. समाजातील खोट्या परंपरांना आणि अंधश्रद्धांना त्यांनी उघडपणे विरोध केला. त्यांच्या विचारांमध्ये विद्रोह होता, पण तो विद्रोह मानवतेच्या भल्यासाठी , कल्याणासाठी होता.ज्योतिबांची लेखणीही तेवढीच प्रभावी होती. त्यांनी गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड यांसारखी ग्रंथसंपदा निर्माण केली. त्यांच्या लेखनातून शोषितांच्या वेदना आणि अन्यायाविरुद्धचा आवाज स्पष्टपणे ऐकू येतो. विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली... हा त्यांचा अभंग आजही समाजाला जागृत करणारा आहे. या ओळींमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि अज्ञानाचे दुष्परिणाम अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत.

त्यांचे जीवन म्हणजे एक अखंड संघर्ष होता– अज्ञानाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध आणि विषमतेविरुद्ध. त्यांनी केलेले बंड हे केवळ सामाजिक नव्हते, तर ते वैचारिक आणि मानवी मूल्यांचे होते. त्यांनी समाजाला प्रश्न विचारायला शिकवले, विचार करायला शिकवले आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहायला शिकवले. ज्या काळात जातीव्यवस्थेने समाजाचा बेड्या घातल्या होत्या. त्या काळात फुले यांनी समतेचा ध्वज उंचावला .त्यांनी स्पष्ट सांगितले की माणसाची किंमत त्यांच्या जातीने नाही , तर त्यांच्या मानवतेने ठरते. हा विचार त्या काळात एक प्रकारचा विद्रोह होता. समाजाच्या रूढीवादी चौकटींना आव्हान देणे म्हणजे स्वतःवर संकट उडवून घेणे होते. पण या आव्हानापेक्षा त्यांना सत्य आणि न्याय जास्त महत्त्वाचा वाटला.आजच्या काळातही ज्योतिराव फुले यांचे विचार तितकेच सुसंगत आहेत. शिक्षण, समता आणि मानवता यांचा मार्ग त्यांनी दाखवला. त्यांची क्रांती ही तलवारीची नव्हती, तर विचारांची होती–आणि म्हणूनच ती अधिक प्रभावी ठरली.क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले हे एक विचारधारा होते. त्यांनी पेटवलेली मशाल आजही समाजाला उजेड देत आहे. त्या प्रकाशात चालत राहणे, हेच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

मनिषा आनंदराव कांबळे यवतमाळ

## राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृहाचे आष्टीत लोकार्पण

### ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थ्यांना मोठा दिलासा; मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा उत्साहात

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथे राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृह इमारतीचा लोकार्पण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांच्या हस्ते या भव्य इमारतीचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी बोलताना पुरुषोत्तम खेडेकर यांनी सांगितले की, ग्रामीण भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांना या वसतिगृहाचा मोठा फायदा होणार असून त्यांच्या शिक्षणाला भक्कम आधार मिळेल. समाजाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात आमदार सतीश भाऊ चव्हाण (मराठवाडा पदवीधर मतदारसंघ), माजी आमदार सुरेश आण्णा धस, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घोगरे, प्र. कार्याध्यक्ष इंजि. नवनाथ घाडगे, जेष्ठ मार्गदर्शक अर्जुनराव तनपुरे, संभाजी ब्रिगेडचे प्र. अध्यक्ष मनोज (दादा) आखरे,



जिजाऊ ब्रिगेडच्या प्र. अध्यक्षा सीमाताई बोके, प्र. उपाध्यक्षा वर्षाताई माने, तसेच इंजि. रोहिदास लांडगे, इंजि. चंद्रशेखर शिखरे, अशोक ठाकरे, इंजि. कृष्णा घुगे, इंजि. तानाजी जंजीरे, भास्कर निंबाळकर, माजी आमदार भीमराव धोंडे आणि माजी मुख्यकार्य अधिकारी अशोक कोल्हे यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश होता.कार्यक्रमाचे आयोजन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले होते. उपस्थितांनी वसतिगृहाच्या उपक्रमाचे स्वागत करत विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## निर्भीड पत्रकार प्रदीप मगरे यांचा वाढदिवस मित्रपरिवाराकडून उत्साहात साजरा

नांदेड प्रतिनीधी;

सामाजिक बांधिलकी जपणारे तसेच पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडणारे निर्भीड पत्रकार प्रदीप मगरे यांचा वाढदिवस मित्रपरिवाराच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात आनंदी व उत्साही वातावरण अनुभवायला मिळाले. कार्यक्रमाची सुरुवात केक कापून करण्यात आली. यावेळी उपस्थित मित्रमंडळींनी पुष्पगुच्छ देऊन प्रदीप मगरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या कार्याचा गौरव केला. संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमाला पत्रकार संजय निळेकर, संतोष पाटील गवारे, धमानंद गोपाळे, राहुल तारु, बालाजी वाघमारे यांच्यासह अनेक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी प्रदीप मगरे यांच्या पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरव केला.प्रदीप मगरे हे जनतेचा आवाज न्यूजचे संपादक म्हणून कार्यरत असून त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत विविध समस्यांवर निर्भीडपणे आवाज उठवत त्यांनी जनतेचा



विश्वास संपादन केला आहे. त्यांच्या बातम्यांमुळे अनेक प्रश्नांना न्याय मिळाल्याचेही यावेळी वक्त्यांनी नमूद केले.प्रदीप मगरे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची पावती म्हणून राज्यस्तरीय छत्रपती समाज भूषण पुरस्कार (पत्रकारिता क्षेत्रात) तसेच साई जीवन गौरव समाज भूषण राज्यस्तरीय पुरस्कार (पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात) देऊन सन्मानित करण्यात आले आहे.यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देत त्यांनी असेच समाजकार्य व पत्रकारिता करत राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला.

## मुख्याध्यापकांचा अनोखा सत्कार; विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड'चे वाटप

### सामाजिक कार्यकर्ते मुसाखान पठाण व शेख वसीम यांचा स्तुत्य उपक्रम

बीड । प्रतिनिधी

बीड येथील मिल्लीया मुलांची प्राथमिक शाळा येथे नुकताच एक प्रेरणादायी उपक्रम पार पडला. शाळेचे मुख्याध्यापक शेर खान सर यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उत्तम कार्याची दखल घेत, त्यांचा सत्कार एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने करण्यात आला. केवळ हार–तुरे न देता, शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना 'एक्झाम पॅड' (परीक्षा पॅड) वाटप करून हा दिवस सामाजिक संदेश देत साजरा करण्यात आला.

उपक्रमाची वैशिष्ट्ये: आयोजक:समाज सेवक मुसाखान पठाण व सामाजिक कार्यकर्ते शेख वसीम.प्रमुख उपस्थिती: मुसाखान पठाण (प्रमुख अतिथी) आणि पत्रकार पठाण अमरजान.उद्देश: मुख्याध्यापकांच्या कार्याचा गौरव करतानाच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजांना मदत करणे.यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे लाडके 'शेर खान सर' यांचा गौरव करण्यात आला आणि त्यानंतर गरजू विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप करण्यात आले. आगामी परीक्षांच्या काळात ही मदत मिळाल्याने विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आनंद व्यक्त केला.शिक्षकांचा सत्कार करताना तो समाजाला आणि विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल अशा पद्धतीने व्हावा, या विचारातून हा उपक्रम राबवण्यात आला. – आयोजकउपस्थित मान्यवर व शिक्षक:या कार्यक्रमाला शाळेतील शेख गफार सर, मोमीन अझरुद्दीन सर, शेख मुस्तमिल सर, शेख इकबाल सर, रफत मॅडम, नूजत मॅडम, नज्मुनिसा सेहर खतीब मॅडम यांच्यासह सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मुख्याध्यापकांच्या सत्काराचे औचित्य साधून राबविलेला हा समाजोपयोगी उपक्रम सध्या बीडमध्ये कौतुकाचा विषय ठरत आहे





## धानोरा महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

### समाजाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची गरज–वाघुले

आष्टी प्रतिनिधी

तालुक्यातील धानोरा येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ वाघुले हे तर उपप्राचार्य गहिनीनाथ एकशिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली.



यावेळी प्राचार्य डॉ वाघुले यांनी आपल्या भाषणात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या समाजसुधारक कार्याचा गौरव करताना शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत आज समाजाला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारांची गरज असल्याचे सांगत, तरुणांनी त्यांचे विचार अंगिकारून समाजातील प्रत्येक घटकाचा विकास करावा. आज विज्ञान युगात ही आपल्या देशात काही ठिकाणी अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धाचे प्रकार पहावयास मिळत आहे. महात्मा फुले यांनी त्यांच्या काळात शिक्षणाचे महत्व सांगत अंधश्रध्दा दूर करून समाजाचा विकास केला. तरुणांनी ही त्यांचे विचार आत्मसात करून समाजाचा विकास करावा असे प्रतिपादन केले. यावेळी उपप्राचार्य एकशिंगे यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा निसार शेख यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा राजू शेलार यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा विवेक महाजन, प्रा अजिनाथ गिलचे, प्रा गोरक्षनाथ वाळके, प्रा राजेंद्र मिसाळ, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा श्रीमती रत्नमाला तरटे, प्रा श्रीमती शबाना शेख, प्रा अतेश बनसोडे, प्रा सतीश तागड, प्रा नितीन बालशंकर यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऊसतोड मजुराच्या लेकीची पोलिस भरतीत भरारी, अभिमानास्पद-प्रेमदास पवार

## प्रतिकूल परिस्थितीतून यश मिळवणं हेच खरं धैर्य-ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार | धारावती तांडा येथील ऊसतोड मजूराची लेक शालू सुनिल पवार परभणी पोलिस दलात निवड | गावकऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार

परळी वैजनाथ

महाराष्ट्र पोलीस भरती प्रक्रियेच्या निकालात बीड जिल्ह्यातील व परळी वैजनाथ तालुक्यातील धारावती तांडा या गावची लेक सौ.शालू सुनिल पवार हिने परभणी पोलिस दलात यशस्वी निवड झाली. तीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या अभिमानास्पद यशाबद्दल गावात तिचा भव्य सत्कार करण्यात आला. धारावती तांडा सारख्या छोट्याशा गावातून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून सौ. शालू सुनिल पवार यांनी मिळवलेलं हे यश खरोखरच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. ऊसतोड मजूर कुटुंबातून पुढे येत त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात स्थान मिळवलं, ही गोष्ट प्रत्येक तरुण-तरुणीसाठी दिशादर्शक आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार अध्यक्ष प्रेमदास पवार यांनी केले आहे. सौ. शालू सुनिल पवार यांनी मिळवलेलं हे यशामागे असलेली जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम पाहता, त्यांनी समाजासमोर एक आदर्श उभा केला आहे. ग्रामीण भागातील मुलींनी शिक्षण आणि मेहनतीच्या जोरावर मोठं यश मिळवू शकतात, याचं हे उत्तम उदाहरण आहे. असे प्रतिपादन ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार यांनी केले.



धारावती तांडा (ता. परळी वैजनाथ, जि. बीड) येथील सौ.शालू सुनिल पवार यांची महाराष्ट्र पोलीस दलात परभणी येथे झालेली निवड ही संपूर्ण गावासाठी अत्यंत अभिमानास्पद व प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गावात भव्य दिव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून, जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर शालू पवार यांनी २०२६ च्या महाराष्ट्र पोलीस भरती परीक्षेत यश संपादन केले. ऊसतोड मजूर कुटुंबातील मुलगी असलेल्या शालू यांनी लहानशा गावातून शिक्षणाची सुरुवात करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धारावती येथून शिक्षण घेतले, तसेच पुढे मॉर्डन कॉलेजमधून बारावी व बी.कॉम पूर्ण केले. पुणे येथे गेल्या पाच वर्षांत आणि गावात एक वर्ष सातत्याने अभ्यास व मेहनत घेत त्यांनी हे यश मिळवले. विशेष म्हणजे, यापूर्वीच त्यांची गावातील पोलिस पाटील पदावरही नियुक्ती झाली होती. त्यांच्या या दुहेरी यशामुळे गावकऱ्यांमध्ये अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार अध्यक्ष प्रेमदास पवार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच काशीनाथ सुखदेव राठोड,माजी सरपंच हिरामण भिवसिंग राठोड, ग्रामपंचायत सदस्य राजकुमार विठ्ठल राठोड, ग्रामपंचायत सदस्य रमेश पवार,ग्रामपंचायत सदस्य यमुनाबाई सुग्रीव पवार, ग्रामपंचायत सदस्य प्रविण पवार, विजय भानुदास पवार, संजय भानुदास पवार, देविदास गोविंद पवार, हनुमान बापूराव पवार, बापूराव लक्ष्मण पवार, गौळणबाई भगवान पवार, गोपाबाई भानुदास पवार, अंबादास लक्ष्मण पवार, प्रकाश सुभाष पवार, रामेश्वर सुभाष पवार, भाऊराव गोविंद पवार, उत्तम हेमा पवार, रंगनाथ पवार, अर्जुन संजय राठोड, त्र्यंबक विठ्ठल राठोड प्रकाश लक्ष्मण राठोड कृष्णा अंबादास पवार भगवान ऊमाजी राठोड अरुण सुभाष राठोड रमेश बाबू राठोड वैजनाथ बाबू राठोड परमेश्वर प्रभू पवार सूर्यकांत मिठाराम राठोड प्रताप धर्मराज राठोड अशोक भगवान पवार रामेश्वर प्रभू पवार संजय देविदास पवार विक्रम नामदेव पवार कृष्णा रंगनाथ राठोड कुंडलिक भोपा राठोड उत्तम मेघा पवार तसेच गावातील अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शालू पवार यांच्या यशामागे त्यांच्या आई-वडिलांची अथक मेहनत व त्याग हे महत्त्वाचे घटक आहेत. अनेक वर्षे ऊसतोड मजूर म्हणून काम करत असताना त्यांनी आपल्या मुलीच्या शिक्षणासाठी कधीही मागे हटले नाही. आज त्यांच्या कष्टाचे फळ संपूर्ण गावासमोर उजळून निघाले आहे. सौ. शालू पवार यांची ही यशोगाथा केवळ एक वैयक्तिक कामगिरी नसून, ती संघर्ष, मेहनत आणि जिद्दीचे प्रतीक आहे. त्यांच्या या यशामुळे धारावती तांडा तसेच परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळाली असून, त्या खऱ्या अर्थाने युवकांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ ठरल्या आहेत. लहानपणापासूनच पोलीस दलात जाण्याचे स्वप्न पाहणाऱ्या शालूने शारीरिक तंदुरुस्ती, अभ्यास आणि मानसिक तयारी यावर सातत्याने मेहनत घेतली. अनेक अडचणींवर मात करत तिने हे स्वप्न साकार केले. माझ्या पत्नीने आज आमचा आणि गावाचा सन्मान वाढवला आहे. तिच्या मेहनतीचा मला अभिमान आहे. अशी प्रतिक्रिया सुनिल पवार यांनी दिली. धारावती तांडा येथील ऊसतोड मजूरची लेक सौ शालू सुनिल पवार परभणी पोलिस दलात निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

---

# हिवरसिंगा शाळेचे मंथन परीक्षेत दिमाखदार यश



शिरूर

मंथन वेल्फेअर असोसिएशन आयोजित महाराष्ट्र राज्य स्पर्धा परीक्षा २०२५-२६ मध्ये जि. प. कें. प्रा. शाळा हिवरसिंगा (ता. शिरूर-कासार, जि. बीड) येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

या स्पर्धा परीक्षेत शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला होता. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश मिळवले असून एकूण २८ विद्यार्थी पात्र ठरले आहेत.इयत्ता पहिलीतील सहापैकी सर्व सहा विद्यार्थी यशस्वी झाले. इयत्ता दुसरीतील दहा विद्यार्थ्यांपैकी चार विद्यार्थ्यांनी यश मिळवले. इयत्ता तिसरीतील पंधरापैकी चार विद्यार्थी पात्र ठरले. इयत्ता चौथीतील दहापैकी चार विद्यार्थी यशस्वी झाले. तसेच इयत्ता पाचवीतील बारा विद्यार्थ्यांपैकी तब्बल दहा विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य मोलाचे ठरले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून शाळेच्या प्रगतीसाठी हा मोठा टप्पा मानला जात आहे. इयत्ता पाचवी मध्ये मिळवलेल्या मंथन स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यशामागे शाळेचे शिक्षक दत्तात्रय दुधाळ यांचे मोलाचे योगदान आहे.त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करत सातत्याने परिश्रम घेतले. तसेच प्रत्येक वर्गाच्या वर्ग शिक्षकांनीही प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेनुसार त्यांना अभ्यासाची दिशा देत त्यांनी मेहनतीने त्यांची तयारी करून घेतली.शिक्षक म्हणून त्यांची जिद्द, कर्तव्यनिष्ठा आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम हेच या यशाचे खरे आधारस्तंभ ठरले आहेत. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत असून ते इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहेत. या यशाबद्दल त्यांचा शाळेमध्ये गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता.शाळेचे मुख्याध्यापक व्ही. के.मिसाळ, शिक्षक दत्तात्रेय दुधाळ, अरुण मिसाळ, अतुल घोरड, संदीप कदम,प्रदीप दुधाळ, शिक्षिका कविता बडवे, सुशीला जेथे, सवित्रा खेत्रे, वर्षा राख उपस्थित होत्या.

---

# माजलगावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमीत्त प्रेरणादायी उपक्रमाची सुरूवात

## ज्ञानेश्वर मेंडके यांचा पुढाकार

माजलगाव, प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमीत्त पंडित दीनदयाळ उपाध्याय शहर स्वच्छता अभियानाची सुरूवात भाजपा नेते ज्ञानेश्वर नाना मेंडके यांच्या पुढकारातुन आज दि. १२ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली.

या अभियानाचे नारळ वाढवून विधीवत उद्घाटन भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. या अभियाना अंतर्गत शहरातील विवीध ठिकाणी शहर स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. यावेळी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्राचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे,




जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, अरूण राउत, डॉ. अशोक तिडके, शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी, नगरसेवक दिपक मुंडे, अभय होके, नारायण मेंडके,ज्ञानेश्वर पवार, कैलास खुर्पे, भरत जोशी, रवी गायकवाड, उमेश जाधव, दत्ता जाधव, जक्की इनामदार यांचेसह भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान भाजपा नेते ज्ञानेश्वर मेंडके यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला प्रेरीत असा उपक्रम हाती घेत समाज परिवर्तनाच्या विचारांना कृतीत उतरवरत स्वच्छ, सुंदर शहर घडविण्याचा हा स्त्युत्य प्रयत्न असल्याचे उपस्थितांनी सांगीतले.

---

# हिंगोली जिल्ह्यात मल्टीनॅशनल कंपन्या आणाव्यात-नदीम कादरी

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली जिल्ह्यात रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी मल्टीनॅशनल कंपन्या आणणे गरजेचे असल्याचे मत भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे सरचिटणीस व हिंगोली जिल्हा अल्पसंख्याक उपाध्यक्ष नदीम कादरी यांनी व्यक्त केले आहे.ते म्हणाले की, जिल्ह्यातील तरुण शिक्षणात प्रगती करत असले तरी रोजगाराच्या अभावामुळे त्यांना संभाजीनगर, पुणे, मुंबई, नाशिक यांसारख्या शहरांकडे स्थलांतर करावे लागत आहे. पालक मुलांना चांगले शिक्षण देत आहेत, मात्र शिक्षणानंतर नोकरीची हमी नसल्याने तरुणांपुढे मोठा प्रश्न निर्माण होत आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर उद्योग निर्माण होणे अत्यावश्यक असून, जिल्ह्यात मोठ्या कंपन्या आल्यास तरुणांना त्यांच्या गावाजवळच रोजगार उपलब्ध होईल, असेही कादरी यांनी सांगितले.हिंगोलीचे आमदार तानाजीराव मुटकुळे तसेच इतर लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन जिल्ह्यात मल्टीनॅशनल कंपन्या आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्याच्या विकासासाठी आणि तरुणांच्या उज्ज्वल भविष्यासाठी उद्योगवाढीवर भर देणे ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

---

# ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकामासह गायरान जमिनींचे नियोजन करा-मनोज घोंगडे

बीड (प्रतिनिधी)



शहरातील नागरी सुविधा अधिक सक्षम व पारदर्शक करण्याच्या दृष्टीने भाजपच्या गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मनोज घोंगडे यांनी बीड नगरपरिषदेच्या नियोजन व विकास समितीकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात ओपन स्पेसचे व्यवस्थापन, कंपाउंड बांधकाम तसेच गायरान जमिनींच्या नियोजनाचा समावेश आहे.

निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील प्रत्येक वॉर्डमधील ओपन स्पेसची स्वतंत्र नोंद ठेवून त्याची माहिती संबंधित नगरसेवकांना देण्यात यावी. या जागांवर अतिक्रमण होऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांच्या हितासाठी या मोकळ्या जागांचा योग्य व नियोजनबद्ध वापर व्हावा, यावर भर देण्यात आला आहे. याशिवाय, शहरातील प्रत्येक ओपन स्पेसभोवती कंपाउंड उभारण्यात यावे, जेणेकरून त्या जागांचे संरक्षण होईल आणि अतिक्रमणाला आळा बसेल. यामुळे शहराच्या नियोजनात शिस्त राहून नागरिकांना सुरक्षित मोकळी जागा उपलब्ध होईल. तसेच, शहरातील गायरान जमिनींवर घरकुलांसाठी भूखंड वाटप करताना प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. गायरान जमिनींचे वाटप करताना नागरिकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ते सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. या तिन्ही मागण्यांची अंमलबजावणी झाल्यास शहरातील नियोजन, पारदर्शकता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

---

# फुले- शाहू-आंबेडकरांचे विचार आचरणातूनच सामाजिक समता निर्माण होईल-प्रा. किरण सगर

मुरूम

वडगाव (गांजा), ता. लोहारा येथे विविध उपक्रमांनी सामाजिक समता सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, धाराशिव यांच्या वतीने महात्मा फुले यांच्या व्दिशताब्दी वर्षानिमित्त व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त दि. ८ ते १४ एप्रिल दरम्यान जिल्हातील विविध भागात सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्या अंतर्गत शनिवारी (ता. ११) रोजी वडगाव, ता. लोहारा येथे क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सचिन कवले हे अध्यक्षस्थानी होते. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे माजी सरचिटणीस प्रा. किरण सगर प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी विचारमंचावर समाज कल्याण अधिकारी सनम लामकने,




मुरूम नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ, बार्टीचे प्रकल्प अधिकारी तुषार कदम, उपसरपंच बबन फुलसुंदर, शालेय समिती चे अध्यक्ष सचिन पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. सगर म्हणाले की, समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा नष्ट करणे, जाती निर्मुलन, स्त्री-पुरुष समानता, लग्नातील अनाठायी खर्च, व्यसनमुक्ती, हुंडाबळी, नरबळी, शेतकरी आत्महत्या यावर खऱ्या अर्थाने योग्य दिशेने कार्य करावयाचे असल्यास, महामानवाच्या स्वप्नातील भारत घडवायचा असेल तर त्यांच्या विचारांचे कृतीशील अनुकरण करावे लागेल. त्याशिवाय पर्याय नाही, असे मत मांडत सविस्तर मार्गदर्शन केले.

तर सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी महापुरुषांच्या जयंतीनिमित्त समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना, स्वाधार योजना, ॲट्रॉसिटी कायदा, बचत गटानां ट्रॅक्टर वाटप, जातपाडताळणी, थोर महामानवांच्या जयंती साजरी करणे या बद्दल माहिती दिली.

मान्यवरांच्या हस्ते गावातील नव्याने पोलीस व सैन्यात भरती झालेल्या युवकांचा सत्कार करण्यात आला तसेच रक्तदात्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. सरपंच बबन फुलसुंदर यांच्याकडून रक्तदात्यांना प्रोत्साहन म्हणून पाण्याचे जार वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तुषार कदम यांनी केले. सूत्रसंचालन नागेश फुलसुंदर तर आभार ग्रामसेवक जी. व्ही. करदोरे यांनी मानले. कार्यक्रमास गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यात महिलांचा सहभाग लक्षणीय होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यासागर फुलसुंदर, प्रभाकर साळुंके, विलास फुलसुंदर, डॉ. ज्ञानेश्वर फुलसुंदर, सोमनाथ फुलसुंदर, अमोल साळुंके, महावीर माळी, राजेश फुलसुंदर, पंडित पवार, बबन बेळे, ज्ञानेश्वर भुजबळ, आकाश भुस्कंडे, बापू फुलसुंदर, संजय फुलसुंदर, सोमनाथ साळुंके,ऋषीं बिराजदार, गोविंद लोखण्डे, गणेश पाटील, विद्यासागर पाटील, दशरथ माळी, महादेव गायकवाड, विशाल हिरवे आदींनी पुढाकार घेतला. या सप्ताहानिमित्त रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान, प्रबोधनपर व्याख्यान घेण्यात आले. यात ५२ युवक-युवतींनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान केले तर ९८ गरजू ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करण्यात आली. समतादूत नागेश फुलसुंदर, किरण चिंचोले, रमेश नरवडे, गणेश मोटे, गोविंद लोमटे, सुहास वाघमारे, अर्चना रणदिवे आदींनी विशेष उल्लेखनीय परिश्रम घेतले.

# युनिक फाउंडेशनतर्फे इस्लामिक क्विझ स्पर्धाचा बक्षीस वितरण सोहळा





## विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा गौरव, आदर्श शिक्षकांचा सन्मान; मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाला प्रतिष्ठा

बीड

युनिक सेवाभावी संस्था (UNIQUE FOUND-TION) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या इस्लामिक क्विझ कॉम्पिटिशन–२०२६ या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा तसेच आदर्श शिक्षकांचा भव्य बक्षीस वितरण सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा सन्मान करताना शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या शिक्षकांचाही गौरव करण्यात आला.या स्पर्धेत बीड शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. स्पर्धेच्या निकालानुसार प्रथम क्रमांक सलसबीला रईस खान (मिल्लीया गर्ल्स हायस्कूल, बीड) यांनी पटकावला. द्वितीय क्रमांक आएशा नदीम खान (पीपल्स उर्दू प्रायमरी स्कूल, बीड) यांना मिळाला, तर तृतीय क्रमांक उमर सईद अब्दुलराफे (अलफारोख उर्दू प्रायमरी स्कूल, बीड) यांनी मिळवला. चौथा क्रमांक फारोकी अरशिया सलीम (जि.प. उर्दू स्कूल, रौशनपुरा, बीड) आणि पाचवा क्रमांक शेख सारा मोहम्मद नदीम (सर सय्यद अहमद खान स्कूल, बीड) यांनी प्राप्त केला.



### शिक्षणातून संस्कार घडवण्याचा संदेश

या वेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना इस्लामिक ज्ञानासोबतच आधुनिक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक विकास होऊन योग्य संस्कार घडतात, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. संस्थेच्या उपक्रमांचे कौतुकयुनिक फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, भविष्यातही अशा शैक्षणिक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे आश्वासन आयोजकांनी दिले. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

या प्रसंगी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी मिन्हाज नौशाद खान, मुफ्ती अब्दुल रहेमान, हाफिज शहेबाज खान, हाफिज नदीम खान आणि हाफिज सय्यद जीशान यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेत उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचा गौरव केला.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. आ. विजयसिंह पंडित, स्वच्छता सभापती निजाम शेख, संपादक मुजीब शेख, नगर परिषद बीडचे गटनेते फारूक पटेल, समाजसेवक मोईन मास्टर, शिक्षणमहर्षी मुस्ताक अन्सारी, शेख वकील सर, मिल्लत ग्रुप ऑफ स्कूल्सचे सचिव व दैनिक मिल्लत मित्रचे संपादक उमैर सलीम सर, मिल्लीया गर्ल्स हायस्कूलचे प्राचार्य इरफान सिद्दीकी, शिक्षक नेते शेख मुसा, तंटामुक्ती अध्यक्ष राजू पटेल तसेच युनिक फाउंडेशनचे अध्यक्ष उबेद खान यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

# गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा उल्लेखनीय निकाल

माजलगाव /क्रांतिंवीर प्रतिनिधी

परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाने यंदाच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून विद्यार्थ्यांनी उत्तम गुणवत्तेचे प्रदर्शन करत महाविद्यालयाचा गौरव वाढविला आहे. बीएएमएस द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट टक्केवारी मिळवत यशाची नोंद केली आहे.

परम पूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालयाचा निकाल ८८.६३% लागला असून या निकालामध्ये भावना शहाजी जाधव हिने ७०.३३% गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. धनवर्षा दयानंद बिरादार हिने ६९.७६% गुणांसह द्वितीय, तर अंकिता सुरेश उपरे हिने ६९.१९% गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, नियमित अध्यापन पद्धती, तसेच विद्यार्थ्यांची मेहनत आणि चिकाटी यामुळे हा यशस्वी निकाल शक्य झाला आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षकवृंद आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे उत्तम निकाल देण्याचा संकल्प महाविद्यालयाने व्यक्त केला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयाची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# मुस्लिम आरक्षण मोर्चामध्ये समाजबांधवांनी संख्येने सहभागी व्हावे–अलीम सय्यद

असलम कादरी

चकलांबा : मुस्लिम समाजासाठी रद्द करण्यात आलेल्या पाच टक्के आरक्षणाच्या पुनर्स्थापनेसाठी येत्या १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या भव्य एल्गार मोर्चामध्ये गेवराई तालुक्यातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अलीम सय्यद यांनी केले आहे.हा मोर्चाची सुरुवात बीड मधील जामा मशिद येथून होऊन जिल्हा अधिकारी कार्यालयावर याची सांगता होईल.



ते पुढे म्हणाले की, शिक्षण, नोकरी आणि सामाजिक प्रगतीसाठी आरक्षण अत्यंत आवश्यक असून, राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे मुस्लिम समाजाच्या भविष्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे आपल्या हक्कांसाठी एकजुटीने लढा देणे गरजेचे आहे.या पार्श्वभूमीवर गेवराई तालुक्यात विविध ठिकाणी बैठका घेऊन जनजागृती करण्यात येत असून, युवक, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्व स्तरातील नागरिकांनी मोर्चात सक्रिय सहभाग नोंदवावा, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, या मोर्चाच्या नियोजनासाठी तालुक्यातील कार्यकर्ते सज्ज झाले असून, मोठ्या प्रमाणावर उपस्थिती दर्शवून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात येत आहे.

# बीडमध्ये सामाजिक संस्थांची बैठक संपन्न



बीड

बीड येथील शासकीय विश्रामगृहात सामाजिक संस्थांची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली. ही बैठक सकाळी ११:३० ते दुपारी ४:०० या वेळेत पार पडली. बैठकीदरम्यान महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. बैठकीची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित विविध सामाजिक संस्था व संघटनांच्या प्रतिनिधींनी आपल्या कार्याचा परिचय करून दिला तसेच समाजहिताच्या उपक्रमांबाबत सविस्तर माहिती मांडली.या बैठकीतील महत्त्वाचा निर्णय म्हणजे बीड जिल्हा समता कृती समिती या नवीन समितीची स्थापना. सर्व उपस्थितांच्या एकमताने समितीची कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. निवडलेली कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे – अध्यक्षपदी शाहीन असलम पठाण यांची निवड करण्यात आली असून सचिवपदी रुक्मिणी नागापुरे,उपाध्यक्ष तसलीम इनामदार उपाध्यक्ष किसकिंदा चौरे,उपाध्यक्ष

शैला नाईकवाडे यांची नियुक्ती करण्यात आली समितीच्या सदस्यपदी अनिता कांबळे,रत्नमाला गायकवाड, सत्यभामा सौंदरमल, रुपाली मारुती कुटे, अंजूम पठाण, शकुंतला घुंगासे, हर्षानी लक्ष्मण शिंदे, नागेश शिंदे, बाबासाहेब कोकाटे, लक्ष्मण हजारे,दिलीप हनुमंतराव पाटील, शेख आमेर पाशा आणि विनोद शिंदे यांची निवड करण्यात आली.बैठकीत सामाजिक समता, संघटनात्मक बळकटीकरण आणि विविध समाजघटकांना एकत्र आणण्यासाठी पुढील काळात विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.उपस्थितांनी नव्याने स्थापन झालेल्या समितीमार्फत समाजहितासाठी प्रभावी काम करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# परळीतील कंत्राटी कामगारांना दिलासा

## राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ च्या पाठपुराव्याला यश

परळी वैजनाथ / प्रतिनिधी

राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघच्या परळी वैजनाथ शाखेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून नगरपरिषदेकडील कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन देण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. नगरपालिकेचे नगाराध्यक्ष मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी यांनी सकारात्मक भूमिका घेत कामगारांचे थकीत वेतन अदा केले.कंत्राटी कामगारांना दीर्घकाळापासून वेतन न मिळाल्यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत ठचइघड्च्या पदाधिकाऱ्यांनी एकजूट दाखवत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाल्याने कामगारांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या मागणीसाठी संघटनेचे अध्यक्ष विक्रांत सूर्यकांत समींदरसवळे, कार्यकारी अध्यक्ष बालाजी मारोती गजबे, महासचिव अविनाश वसंतराव गायकवाड, उपाध्यक्ष अमोल अर्जुन मस्के, सचिव सुमेर सूर्यकांत समींदरसवळे, कोषाध्यक्ष संध्या भैय्यासाहेब जगतकर तसेच लता पंडित इंगळे, सुनील माणिकराव जगतकर, कैलास हरिभाऊ उपाडे, भैय्यासाहेब शिवाजीराव जगतकर, अतुल अनिल चौरे, सुभाष आदी सदस्यांनी पुढाकार घेतला होता. संघटना स्थापन झाल्यानंतर पहिल्याच मोठ्या मागणीला यश मिळाल्याने पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, त्यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांचे आभार मानले आहेत. तसेच पुढील काळातही कामगारांच्या हक्कासाठी लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# माजलगावात महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी; आझाद क्रांती सेनेचा पुढाकार

माजलगांव / प्रतिनिधी

माजलगाव शहरासह तालुक्यात विविध ठिकाणी महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या आझाद क्रांती सेनेच्या वतीने या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील प्रमुख चौक, सार्वजनिक ठिकाणे तसेच शाळा व संस्थांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आझाद क्रांती सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी एकत्र येत फुले यांच्या विचारांचे स्मरण केले आणि समाजप्रबोधनाचा संदेश दिला.

कार्यक्रमादरम्यान वक्त्यांनी महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेत, त्यांनी शिक्षण, स्त्री–पुरुष समानता व शेतकरी हक्कांसाठी दिलेल्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. या प्रसंगी युवक–युवतींचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. तसेच समाजातील विविध घटकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून जयंती कार्यक्रमाला प्रतिसाद दिला. आझाद क्रांती सेनेच्या वतीने अशा सामाजिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन पुढेही सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी सेना प्रमुख राजेश घोडे, तालुका प्रमुख अशोक ढगे, गणेश थोरात,सूरज सावंत, पांडुरंग शिंदे आदी उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, मोहन दत्तु गुंड यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर्स एम.एस.सी.बी ऑफीस जवळ माळीवेस ,बीड– ४३११२२ येथे छापून साप्ताहिक क्रांतीवीर कार्यालय, गुंड गल्ली केज ता.जिल्हा जि.बीड – ४३११२३ येथे प्रकाशीत केले आहे. मो ९४२३९७९४९२ Email- ID skrantiveer66gmail.com या अंकामध्ये प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही,वाद विवाद केज न्यायालय अंतर्गत. कार्यकारी संपादक आप्पासाहेब महानोर मो ९५११७१२५९२
This News paper's owner, printr, editor, Mohan Dattu Gund printed this at the Mauli Offset Printers, Near Office MSCB at Malives, Beed-431122. and published at Weekly Krantiveer Office, Gund Galli, Kej Tq. Kaij Dist Beed Bead-431123. Mob 9423979492, Email ID– skrantiveer66@gmail.com Editor is not totally agree or disagree with the news and articles this issue. Disputes under jurisdiction of Kaij court. Executive Division Appasaheb Mahanor, Mo-9511712592